आयपीएल सामना क्र.६७
दिल्ली विरुद्ध चेन्नई
वेळ : दु.३.३० वा. स्थळ : जेटली स्टेडियम, दिल्ली

अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.६८
लखनौ विरुद्ध कोलकता
वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : ईडन गार्डन, कोलकाता

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २० मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २३० वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# बापरे, बाळाची तीन लाखाला विक्री करणाऱ्यांचा केला पर्दाफाश

## खोटा बॉण्ड तयार केला, आई-वडिलांसह १० जणांविरुध्द गुन्हा दाखल...

सुराज्य/सोलापूर

**एक नवजात बाळ दत्तक घेतल्याचा खोटा बाँड तयार करून त्या बाळाची तीन लाख रुपयास विक्री करणाऱ्या आठ लोकांच्या कारनाम्याचा पोलिसांनी अखेर पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी त्या बाळाच्या आई-वडिलांसह दहा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार उघडकीस आल्यामुळे सोलापुरात बाळांची विक्री करणाऱ्यांचा वावर असल्याचा संशय वाढला आहे.**

याबाबत सदर बझार पोलीस ठाण्याकडून मिळालेली माहिती अशी की, देगाव नाका हब्बू वस्ती येथील एका महिलेला ३० एप्रिल रोजी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मुलगा झाला. याअगोदर तिला तीनही मुले झाली होती. चौथा मुलगा झाल्यानंतर तिच्या ओळखीच्या संगीता बगले या महिलेने हे चौथे मूल आपल्याला देण्यास सांगितले. तुला अगोदरची तीन मुले आहेत. चौथा घेऊन काय करतेस? तुझा नवरा दारुडा आहे. त्या मुलाचा आम्ही सांभाळ करू. त्याचे औषध पाणी बघू असे म्हटल्यानंतर त्या मातेने हे बाळ संगीताच्या ताब्यात दिले.

केवळ अठरा दिवसांचे हे बाळ दिल्यानंतर त्या मातेला संशय आला. संगीताने कुणाला तरी या बाळाची विक्री केल्याचा संशय बळावल्यानंतर त्या मातेने थेट सदर बझार पोलीस ठाण्यात येऊन १७ मे रोजी तक्रार दिली. त्यानुसार हेड कॉन्स्टेबल रफिक इनामदार यांनी तपास हाती घेतला. इनामदार यांनी केवळ दोन दिवसात तपासाची चक्रे गतीने फिरवली. त्यात धक्कादायक प्रकार उघडकीस आला. संगीता मोहन बगले, सुजाता दयानंद शिखरे, रूपाबाई जगले व तिचा मुलगा सॅमसन जगले यांनी संगनमत करून ३ लाखाला हे बाळ खरेदी करून घेतले.



### बाळ ताब्यात दिले पण...

**पोहेकॉ. रफिक इनामदार यांनी संगीता बगले, पारूबाई शिंदे, रूपाबाई जगले व मंगल जाधव यांच्याकडे चौकशी केल्यानंतर बाळाच्या आई वडिलांनी ३ लाखाला हे बाळ विक्री करण्याचे ठरवले. सदर व्यवहारापोटी मंगल जाधव हिने रूपाबाई जगले यांना सर्व रक्कम दिली. त्यानंतर रूपाबाई हिने त्यापैकी स्वतकडे ८० हजार रूपये ठेवून घेत उर्वरित २ लाख २० हजार संगीता बगले व पारूबाई शिंदे यांना दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. केवळ दोन दिवसात या प्रकरणाचा पदार्फाश करून इनामदार यांनी ते बाळ सुखरूप आई-वडिलांच्या ताब्यात दिले. यात आई-वडीलही दोषी असल्याचे निष्पन्न झाले आहे.**

सदरचे बाळ दत्तक घेतल्याचा खोटा बॉन्ड तयार करून त्यावर बाळ घेणाऱ्याचे नाव नमूद न करता ते बाळ मंगल अरुण जाधव यांना विकले. मंगल जाधव यांची मुलगी कामाक्षी चंद्रकांत जाधव यांना कोणतीही दत्तक घेण्याची कायदेशीर प्रक्रिया न करता बेकायदेशीरपणे हे बाळ सांभाळण्यास दिले. या प्रकारानंतर पोलीस हेड हेड कॉन्स्टेबल रफिक इनामदार यांनी बाळाच्या आई वडिलांसह दहा जणांवर फिर्याद दाखल केली. त्यानुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

यात बाळाला विकल्याप्रकरणी आई-वडिलांसह संगीता मोहन बगले (रा. बुधवार पेठ), सुरेखा दयानंद शिखरे (रा. देगाव नाका, हब्बू वस्ती), पारुबाई दत्तात्रय शिंदे (रा. दमाणी नगर), रुपा येशू जगले (रा. जगजीवनराम झोपडपट्टी), सॅमसन येशू जगले (रा. जगजीवनराम झोपडपट्टी), मंगल अरुण शिंदे (रा. ख्रिश्चन स्मशानभूमीजवळ), कामाक्षी चंद्रकांत जाधव (रा. विजापूर रोड) तसेच एका अ...त (रा. लिमयेवाडी) अशा १० जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात अल्पवयीन न्याय कायदाअंतर्गत गुन्हा दाखल झाला. सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक क्षीरसागर, धायतोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल इनामदार हे अधिक करीत आहेत.

> प्रत्यक्षात हे बाळ नेमके कुठे आहे याची चौकशी करत असताना संबंधिताच्या घरापर्यंत गेलो असताना तेथील शेजाऱ्यांनी हे बाळ हैदराबादला घेऊन गेले आहेत, असे खोटे सांगितले परंतु आम्ही खाक्या दाखवल्यानंतर आणि मोबाईल लोकेशन चेक केल्यानंतर ते बाळ सोलापुरातच एका महिलेकडे असल्याचे निष्पन्न झाले.
>
> **- रफिक इनामदार, पोलीस हेड कॉन्स्टेबल**

# दोन हजाराच्या नोटांवर 'बॅन'; चलनातून होणार हद्दपार

### ३० सप्टेंबरपर्यंत वैध राहणार

सुराज्य/नवी दिल्ली



भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) आज बाजारातील चलनातून दोन रुपयांच्या नोटांवर बॅन टाकून त्या हद्दपार करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

सध्या बाजारात चलनात असलेल्या दोन हजाराच्या नोटा ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत वापरता येणार असल्याचे आरबीआयने म्हटले आहे. २०१८-१९ मध्येच दोन हजार रुपयांच्या नोटांची छपाई थावण्यात आली होती. आणि आता या नोटाच बंद करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. नागरिकांना सध्या बाजारात चलनात असलेल्ला या दोन हजार रुपयांच्या नोटा बदलून घेण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दोन हजाराच्या नोटा चलनातून काढून घेतल्या असल्या तरी त्या नोटा सध्या अवैध ठरणार नाहीत. त्या आपल्याला दिलेल्या मुदतीपर्यंत जमा करता येणार आहेत. ८ नोव्हेंबर २०१६ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाचशे आणि एक हजाराच्या नोटा चलनातून बंद केल्या होत्या. त्यांच्या जागी नवीन ५०० आणि २००० च्या नव्या नोटा जारी करण्यात आल्या होत्या. (उर्वरित वृत्त पान ५)

# तोतया पत्रकाराची बिल्डरकडे ५० लाख अन् २ फ्लॅटची डिमांड

## पुण्यात महेश व दिनेश हणमे यांना २३ मेंपर्यंत पोलीस कोठडी

सुराज्य/पुणे

सोलापूरचे तोतया पत्रकार महेश सौदागर हणमे (वय ४७) आणि दिनेश सौदागर हणमे (४४, दोघे रा. राजेश्वरी नगर, ब्लॉक नं. ११२, बाळे, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर) यांनी पुणे आणि सोलापूर स्थित बिल्डरकडे ५० लाख रुपये आणि २ फ्लॅटच्या खंडणीची मागणी केली असल्याची धक्कादायक माहिती आता समोर आली आहे. याबाबत पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेचा तपास सुरू आहे. दरम्यान, तोतया पत्रकार हणमे बंधूंना शिवाजीनगर येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना दि. २३ मे २०२३ पर्यंत पोलीस कोठडीत सुनावण्यात आली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, खराडी येथील सॉफ्टवेअर कंपनीचे मालक संतोष पोपट थोरात (रा. अल्कॉन सोसायटी, खराडी पुणे) यांच्याकडे ५ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी तोतया पत्रकार हणमे बंधूंना गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथक-२ ने अटक केली आहे. त्यांना अटक करण्यासाठी पोलीस गेले असता हणमे बंधूंनी पोलिसांच्या अंगावर चारचाकी घालून त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. पोलिसांनी प्रसंगावधान राखून बचावासाठी त्यांच्या गाडीच्या मागील टायरच्या दिशेने गोळीबार देखील केला होता. त्यांना पाठलाग करून अटक करण्यात आले होते.

हणमे बंधूंना न्यायालयात शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना दि. २३ मे २०२३ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, हणमे बंधूंचे आणखी एक खंडणी प्रकरण उजेडात आले आहे. त्याबाबत गुन्हे शाखेचे पोलीस सखोल तपास करीत आहेत. पुण्यातील भोसरीमध्ये राहणाऱ्या एका बिल्डरची कन्स्ट्रक्शन साईट सोलापूर येथे सुरू आहे. हणमे बंधूंनी त्या बिल्डरकडे देखील ५० लाख रुपये आणि २ फ्लॅटच्या खंडणीची मागणी केली होती.

याबाबत संबंधित बिल्डरने गुन्हे शाखेच्या पोलिसांकडे संपर्क साधला असून पोलीस त्याबाबतचा तपास करीत असल्याची माहिती देण्यात आली आहे. हणमे बंधूंना पुणे पोलीस आयुक्त रितेश कुमार सह पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक-२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रताप मानकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक चांगदेव सजग, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक मोहनदास जाधव, पोलीस अंमलदार विजय गुरव, पोलीस प्रदीप शितोळे, विनोद साळुंके, संग्राम शिनगारे, सुरेंद्र जगदाळे, सैदोबा भोजराव, सचिन अहिवळे, अमोल पिलाने, चेतन आपटे, अनिल मेंगडे, ईश्वर आंधळे, राहुल उत्तरकर, पवन भोसले, चेतन शिरोळे, प्रदीप गाडे, किशोर बर्गे आणि आशा कोळेकर यांच्या पथकाने अटक केली होती.

> ### पोलिसांचे आवाहन
> दरम्यान, महेश व दिनेश हणमे बंधुंनी अशा प्रकारे आणखी कोणाला खंडणी मागितली असल्यास पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# सीआयडीच्या हातावर 'तुरी', पीआयसह ७ पोलीस पसार

## दोन दिवस झाले, शोधूनही थांगपत्ता लागेना!

सुराज्य/सोलापूर

> ### मोबाईल बंद करुन गायब झाले
> सीआयडीचे पथक पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक शीतलकुमार कोल्हाळ आणि इतर ५ पोलीस अंमलदारांच्या अटकेसाठी सोलापूरमध्ये दाखल झाले. त्याबाबतची माहिती संबंधितांना समजल्याने त्यांनी तात्काळ त्यांचे मोबाईल फोन बंद केले आणि ते गायब झाले. सीआयडीच्या पथकाने गायब झालेल्यांचा शोध घेण्यासाठी सोलापुरात तळ ठोकला आहे.

पोलिसांच्या हातावर तुरी देऊन आरोपी पसार झाला, अशा आशयाच्या बातम्या आपल्याला कधी कधी वाचायला मिळतात पण सोलापुरात एक अफलातून प्रकार घडला आहे. एका पीआयसह सात पोलीस सीआयडीच्या पथकाला गुंगारा देऊन पसार झाल्याने पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून हे पथक सोलापुरात तळ ठोकून आहे. या पथकाने सारे शहर पिंजून काढले. जिल्ह्यात शोध मोहीमही सुरू आहे. हे पोलीस सीआयडीच्या हाती लागले नाहीत.

राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे (सीआयडी) पथक डेथ इन कस्टडीच्या प्रकरणात आपल्याला अटक करण्यासाठी आल्याचे समजताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षकासह ७ पोलीस गुरूवारी मध्यरात्री ड्युटी सोडून पसार झाले आहेत. सीआयडीच्या पथकाने त्यांची शोध मोहीम अधिक तीव्र केली आहे. सीआयडीचे पथक संबंधितांचा शोध घेत असल्याची माहिती पोलीस उपअधीक्षक गिरीष दिघावकर यांनी दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, सप्टेंबर २०२१ मध्ये घरफोडी, चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी भीमा रज्जा काळे (४२, रा. भांबुरे वस्ती, पारधी वस्ती, कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर) याला अटक केल्यानंतर त्याला पोलीस कोठडीत ठेवण्यात आले होते. पोलिसांनी त्याला मारहाण केल्याने तो गंभीर जखमी झाला.

उपचारासाठी आरोपीला सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र त्याचा दि. ३ ऑक्टोबर २०२१ रोजी मृत्यू झाला. विजापूर नाका पोलीस स्टेशनच्या कोठडीत त्याला मारहाण झाला होती. मारहाणीत मृत्यू झाल्याने प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपविण्यात आला.

पोलिसांच्या मारहाणीमुळे आणि हलगर्जीपणामुळे आरोपीचा मृत्यू झाल्याचा ठपका ठेवत सीआयडीने त्यावेळी विजापूर नाका पोलीस स्टेशनचे आणि सध्या चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह शामराव पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक शीतलकुमार मारुती कोल्हाळ, पोलीस अंमलदार श्रीरंग तुकाराम खांडेकर, पोलीस अंमलदार शिवानंद दत्तात्रय भिमदे, पोलीस अंमलदार, अंबादास बालाजी गड्डम, पोलीस अंमलदार अतिश काकासाहेब पाटील आणि पोलीस अंमलदार लक्ष्मण पोमु राठोड यांच्यावर दि. २१ एप्रिल २०२२ रोजी गुन्हा दाखल केला होता. त्यावेळी सीआयडीचे पोलीस उपअधीक्षक श्रीशैल्य सिद्रामप्पा गजा यांनी गुन्हा दाखल केला होता. त्यासंदर्भात सीआयडीने सोलापूरच्या पोलीस आयुक्तांना अहवाल देखील सादर केला होता. सदरील गुन्ह्याचा तपास सीआयडीचे पथक करीत होते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




शेवटी त्यांना व्हिडिओ कॉलिंगची सुविधा पुरविली

| कल्याण | मेन बाजार |
| --- | --- |
| 389-06-358 | 178-64-239 |

# वैशाख वणव्याचा तोरा लवकरच उतरणार

## पुढील तीन-चार दिवसात बंगालच्या उपसागरात येणार

## मान्सून दक्षिण अंदमानच्या समुद्रात तीन दिवस आधीच दाखल

सुराज्य/सोलापूर

**वैशाख वणव्यामुळे हैराण झालेल्या सोलापूरकरांसाठी एक गुड न्यूज हाती आली आहे. मान्सून दक्षिण अंदमानच्या समुद्रात तीन दिवस आधीच दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. तो पुढील तीन-चार दिवसात बंगालच्या उपसागरात थडकेल, असे हवामान खात्याकडून सांगण्यात आले. त्यामुळे वैशाख वणव्याचा तोरा लवकरच संपेल आणि मान्सूनपूर्व पावसामुळे सोलापूरकरांची घालमेल संपून जाईल, असे वाटते.**

साधारणपणे २२ मे रोजी दक्षिण मान्सून हा अंदमानाच्या समुद्रात दाखल होत असतो, यावर्षी तो तीन दिवस आधीच दाखल झालेला आहे. नैऋत्य मान्सून आता अंदमान समुद्राच्या काही भागात दाखल झाला आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. पुढील तीन ते चार दिवसात दक्षिण बंगालच्या उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान, निकोबारच्या आणखी काही भागांमध्ये मान्सून पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचीही माहिती देण्यात आली आहे. तर ४ जून रोजी मान्सून केरळात दाखल होणार आहे. यावर्षी मान्सूनचे आगमन चार दिवस उशिरा होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे दरवर्षी १ जून रोजी केरळमध्ये दाखल होणारा मान्सून हा या वर्षी ४ जून रोजी दाखल होणार आहे.

# सूर्य पुन्हा तळपला, सोलापूरकरांची होरपळ

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहराचा शनिवारचा पारा एकदम चढला.कमाल तापमान ४३ अंशांपर्यंत गेले होते.त्यामुळे दिवसभर उन्हाच्या चटक्यांनी सोलापूरकरांची होरपळ झाली. गेल्याच आठवड्यात तापमान ४३.४ अंश सेल्सिअसपर्यंत गेले होते. त्यानंतर तापमानात घट झाली होती.

काल परवा पारा ३९ अंशांपर्यंत आला होता मात्र शनिवारी सूर्याने पुन्हा रुद्रावतार घेतला. शनिवारी सकाळी नऊ वाजल्यापासूनच उन्हाचे चटके जाणवू लागले. त्याचवेळी तापमान वाढण्याची चाहूल सोलापूरकरांना लागली होती. दुपारी बारानंतर प्रखर उन्हात होरपळ सुरू झाली.सायंकाळी सूर्यास्तानंतरही हवेतील गरम वाफा असह्य होत होत्या. राज्यातील काही शहरांमध्ये तापमान वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने दोन दिवसांपूर्वीच दिला होता.



जुळे सोलापुरातील रस्त्यावर शुकशुकाट